**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत नामदेव यांचा सामाजिक विचार

**प्रा. अशोक अलगोंडी**

मराठी विभाग, शिवानंद महाविद्यालय, कागवाड, जि. बेळगाव (कर्नाटक) - ५९१२२३

"नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी" म्हणत जातीभेद आणि कर्मकांडाच्या अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला विवेकी ज्ञानाचा प्रकाश दाखवणारे संत नामदेव हे द्रष्टे समाजसुधारक होते. समकालीन समाजाचा तटस्थ वृत्तीने विचार त्यांनी केला. त्यांच्या या तटस्थ वृत्तीचे फलित म्हणजे त्यांनी निर्मिलेली जवळपास अडीच हजार अभंग रचना होय. अभंग, कीर्तन, आरती, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रणे इत्यादी वारकरी परंपरेची सुरवात संत नामदेवांनी केली. ते केवळ कवी, अभंगकार, कीर्तनकार नव्हते तर, समाज हित इच्छिणारे व युगप्रवर्तक समाज क्रांतिकारक होते. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी स्वकर्तृत्वाने केले. मराठीतील पहिले चरित्रकार आणि आत्मचरित्रकार असे नामदेवांना मानले जाते. त्यांच्या अभंगातून त्यांनी संत ज्ञानेश्वर, चोखामेळा आदींचे चरित्र लेखन केले आहे.

संत नामदेवांचा जन्म ११९२ मध्ये सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी-बामणी (नरसी नामदेव) येथे रेळेकर कुटुंबात झाला. दामाशेट्टी हे संत नामदेवांचे वडील व गोणाई त्यांची माता होती. दामाशेटींचा व्यवसाय कपडे शिवणे हा होता. म्हणजे ते शिंपी होते. संत नामदेवांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्रीविठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली. तत्कालीन सामाजिक परिस्तिथीवर त्यांनी भाष्य करताना समाजातील कर्मठपणावर हल्ला चढवला आहे.

**कर्मकांडाला विरोध:**

संत नामदेव हे १३ व्या शतकातील वारकरी प्रबोधन चळवळीचे रचनाकार आहेत. तत्कालीन समाजात अंधश्रद्धा, व्रतवैकल्ये यांचे प्रचंड स्तोम माजलेले होते. देव-देवतांचा सुळसुळाट झालेला होता. अशावेळी समाजाला योग्य दिशा देण्याचे काम नामदेवांनी केले. मन शुद्ध नसेल तर ध्यान जप या गोष्टी कशासाठी ? जोग, तप, होम-हवन, व्रत काय कामाचे ?१ असे थेट सवाल नामदेवांनी अभंगातून केले आहेत. यज्ञ व तंत्र या कर्मकांडांना त्यांनी विरोध केला. समाजाला कर्मकांड करू नका असे सांगून ते थांबले नाहीत. तर नामस्मरण हे त्याला पर्यायी साधन म्हणून त्याला लोकांपुढे आणले. कर्मकांडात विधिकर्ता म्हणजेच ब्राम्हण

मध्यस्थी लागतो. जो सामान्यांचे अनेकप्रकारे शोषण करतो. नामस्मरणात असा मध्यस्थी लागत नाही.

अध्यात्मात मोक्षप्राप्ती आणि सर्व विकारातून मुक्ती या धारनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वतःला मोक्ष - मुक्ती मिळावी म्हणून भक्तिमार्ग अनेकांनी अवलंबलेला दिसतो. संत नामदेवांनी मात्र मोक्ष-मुक्ती नाकारली आहे. ते आपल्या अभंगात म्हणतात, 'जो संसार विन्मुख झाला आहे तोच मोक्षाचा विचार करतो. पंढरीची वारी सोडून मोक्ष मागतो तो भिकारी आहे. जन्मोजन्मीचा आळशी माणूसच मुक्तीची अभिलाषा धरतो. ज्याला नागमोडी माहीत नाही, तो मुक्तीसाठी चरफडतो. गर्भवासाला घाबरलेले लोक मुक्ती मागतात.'२

**धर्मांधतेचे खंडन:**

धर्म संस्कृतीच्या क्षेत्रात होणारे आक्रमण नामदेवांनी विवेकी विचाराने थोपविले. तत्कालीन व्यवस्थेच्या विरोधात बोलताना संत नामदेवांनी भाषा जहाल कधीच वापरली नाही. त्यांचा विरोध हा शांत आणि शीतल भाषेतून व्यक्त झाला आहे. धर्मांध मुस्लिम राजवटीने जेव्हा मंदिरावर हल्ले केले तेव्हा "दगडांचा देव इच्छा पुरवीत, तरी का भंगत आघाताने?" असे म्हणत एकाही देवाला स्वतःचा बचाव का करता आला नाही? असा खडा सवाल ते करतात. हिंदू धर्मात तत्कालीन ब्राम्हणांचे माजलेले अवडंबर नेमक्या शब्दात मांडून त्यांची पोलखोल केली आहे. "शास्त्रीपंडितांकडे देवाचे स्वरूप काय म्हणून विचारावयास गेलो, तर त्याच्याजवळ भेदाभेद भरला होता. मतमतांतरे व भ्रांत गर्वाने हे शास्त्री भुलले होते. पुराणिकाकडे गेलो, तर विषयांत मन ठेवून ब्रह्मज्ञान सांगत होता. हरिदासास भक्तीचा उपाय विचारू लागलो , तर तेथेही मुखी नाम आणि मनी सदाकाळ विषयवासनाच दिसत होती."३ स्वतःच्या अनुभवातून त्यांनी ब्राह्मणांच्या पांडित्यावर टीका केली. इतकेच नाही तर भट ब्राह्मणांना दान किंवा दक्षिणा देणे-घेणे याचा निषेध संत नामदेवांनी केला आहे.

समाजात ब्राह्मण हा उच्च म्हणून त्याचा आदर करावा असा संकेत असताना संत नामदेवांनी हा संकेत केवळ काही अभंगातून पाळलेला दिसतो. परंतु इतर अनेक अभंगातून त्यांनी ब्राह्मणांना दोष दिलेला आहे. ब्राह्मणांनी षडकर्मे त्यागली, शुद्ररीती आचरण केले, याचक झाले, दानासाठी लोभी झाले, त्यांना ज्ञानाचा गर्व झाला, कर्मठ अभिमानी झाले या शब्दात नामदेवांनी त्यांच्यावर टिका केली आहे.

**जातीची उतरंड अमान्य:**

***"का करौं जाती का करौं पाती । राजाराम सेंऊ दिन राती।।"४***

अशा शब्दात संत नामदेव जाती-पाती संपवताना दिसतात. विषमतेचे चटके खुद्द संत नामदेवानाही सहन करावे लागले होते. याचा दाखला त्यांनी "नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी। उपमा जातीची देऊ नये।।" या शब्दातून दिला आहे. जातीभेद नष्ट होऊन समाजात

समता प्रस्थापित होण्यासाठी त्यांनी गाईच्या दुधाचे सुयोग्य उदाहरण देऊन पटवून दिले आहे. "अनेक वर्णाच्या गायी असतात, परंतु त्यांचे दूध एक वर्णाचे असते. मग माणसातच तुम्ही ब्राह्मण आणि आम्ही शूद्र का? असा रोखठोक सवाल ते करतात. वर्णव्यवस्थेचा थेटपणे त्यांनी कोठेही विरोध केलेला नसला तरी त्यांनी समर्थनही केलेले नाही. याबाबतीत डॉ. श्यामसुंदर मिरजकर म्हणतात, "चार वर्ण व विविध जाती यांचे अनेक संदर्भ नामदेवांच्या अभंगात येतात. परंतु या व्यवस्थेचे समर्थन कोठेही येत नाही. उलट या व्यवस्थेच्या चिरेबंदीपणाला ढिले करण्याचा प्रयास ते करतात. प्रत्यक्ष दैनंदिन आचरणात, व्यवहारात वर्णजाती व्यवस्था मोडा असा त्यांचा उपदेश नाही. परंतु या व्यवस्थेने घातलेली बंधने,निर्माण केलेले अधिकाराचे संकेत नामदेव झुगारून देतात. विशेषतः धार्मिक उपासनेच्या क्षेत्रात नामदेवांनी जातीव्यवस्थेला मूठमाती देऊन समतेचा पुरस्कार केला आहे."५

जातीभेद त्यांनी केवळ अभंगात नाकारून थांबले नाहीत तर त्यांनी सर्व जातीच्या संतांना वारकरी या एका छताखाली आणून आणून समाजापुढे आदर्श निर्माण केला. संत चोखामेळा, सावता माळी, नरहरी सोनार, संत जनाबाई, कान्होपात्रा आदी तब्बल २४ समकाळातील संत त्यांच्या संगतीत असल्याचे पुरावे त्यांनी लिहिलेल्या अभंगातून मिळतात. ज्या काळात शूद्र-अतिशूद्र समाजाला शिक्षणाचा कसलाच अधिकार नव्हता तेव्हा स्वतः अनौपचारिक पद्धतीने शिक्षण घेऊन इतक्या साऱ्या लोकांना लिहिते करणं ही नामदेवांनी केलेली फार मोठी सामाजिक क्रांती आहे. खऱ्या अर्थाने पहिला लोकशिक्षक आणि अनौपचारिक शिक्षणाचा जनक संत नामदेव आहेत. कन्नड भाषेतील संत पुरंदरदास आणि हिंदीतील कबीर आदी अनेक संतांच्या रचनेवर नामदेवांचा प्रभाव जाणवतो.

**तिर्थाटनाला विरोध:**

संत नामदेवांनी दोन वेळा देशभर भ्रमण केले. पहिल्या वेळी त्यांनी ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई आदींच्या सोबत तीर्थाटन केले. दुसऱ्या वेळी त्यांनी एकट्यानेच भ्रमण करत पंजाबमधील घुमान येथे बराच काळ वास्तव्याला होते. स्वतः दोनदा तीर्थाटन करणारे संत नामदेव तिर्थाटनाला विरोध कसा काय करतात? त्यांचे तीर्थाटन केवळ पर्यटन नव्हते तर ते "नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी" अशा ज्ञानदीप लावण्याच्या उद्देशाने केले. प्रचंड कर्मकांड, अंधश्रद्धा, व्रतवैकल्ये यात अडकलेल्या समाजाला भक्तिमार्गातून सुधारण्याचा हेतू या पर्यटनातून साध्य केला. "हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागात जाऊन आपल्या संप्रदायाची बीजे त्यांनी पेरून ठेवली. पुढच्या दोन-तीन शतकात जे अनेक पंथ निघाले त्यांना या संत यात्रेपासून स्फूर्ती मिळाली असली पाहिजे. जेथे जेथे हे संत जात होते तेथे तेथे जनतेचा, शेतकऱ्यांचा, कारागिरांचा समुदाय त्यांच्या भोवती जमा होत असे; त्यांचा उपदेश ग्रहण करीत असे. त्यांच्या यात्रेचा बहुजन समाजात फार बोलबाला झाला असला

पाहिजे. तसेच प्रचाराचे मुख्य कार्य नामदेवावरच पडले असावे."६ नामदेव पंजाबातील घुमान येथे दीर्घकाळ वास्तव्य केले. तेथे त्यांना मानणारा मोठा वर्ग आजही मोठ्यासंख्येने आहे. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांचा शिष्यपरिवार तेथे पसरलेला होता. याच विचारामुळे त्यांची ६१ हिंदी अभंग रचना शीख धर्माच्या पवित्र ग्रंथात 'ग्रंथसाहिब' मध्ये समाविष्ट केली गेली आहेत. ती 'नामदेवजी की मुखबानी' या नावाने ओळखली जाते.

तीर्थाटने ही समाजाचे प्रबोधन करण्यासाठी करावीत याचे उत्तम आदर्श उदाहरण संत नामदेवांनी स्वतःच्या आचरणातून घालून दिले. तीर्थयात्रा किंवा तीर्थाटने केल्याने कधीच पापमुक्ती, पुण्यप्राप्ती, फळप्राप्ती होत नाही. ती केवळ अंधश्रद्धा असल्याचे मत संत नामदेव नोंदवतात. "मनात अवगुण भरले असतील तर तीर्थाटन करून काय उपयोग? मन संकल्पाची पापे तीर्थांच्या बापानेही धुवून जात नाहीत. गाढवाला अखंड गंगेचे स्नान घडले तरी त्याचे जीवन वायाच जाते."७ ज्यासाठी तीर्थयात्रा करायचे ते आपल्या देहात नांदते. त्यामुळे तिर्थयात्री जाण्याची गरज नाही असे ठामपणे नामदेवांनी म्हटले आहे.

सामाजिक विषमतेने उंचीचे सर्वोच्च टोक गाठलेल्या काळात संत नामदेवांनी कसलाच आक्रस्ताळेपणा न करता समाजात समतेचा विचार रुजविला. याच समतेच्या वाटेवरून नंतरच्या वारकरी संप्रदायातील संतांनी मार्गक्रमण केले. तत्कालीन समाजात वाढलेल्या व्यभिचारावार त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे. परस्त्री ही मातेसमान मानावी हा विचारही त्यांनी मांडला. याशिवाय परस्त्री, परधन, परनिंदा, परपिडा यांचा त्याग करण्याचा त्यांचा उपदेश आहे. नामदेवांनी व्यापक दृष्टिकोनातून या जीवन मूल्यांचा स्वीकार व पुरस्कार केलेला दिसतो.

संदर्भ:

१) श्री नामदेव गाथा - संपा. परसा भागवत, शासकीय, १९७१, पृ. २२४४.
२) उपतोक्त - पृ. ७२६
३) उपरोक्त - पृ. १५८४
४) उपरोक्त - पृ. २१२४
५) संत नामदेव : समाजशास्त्रीय अभ्यास - डॉ. श्यामसुंदर मिरजकर, नाग-नालंदा प्रकाशन, ८ मार्च २०१६, पृ. ३१०
६) महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य - बा.रं. सुंठणकर,लोकवाङ्मय गृह, मुंबई, डिसेंबर २००८, पृ. ४५
७) संत नामदेव : समाजशास्त्रीय अभ्यास - उपरोक्त पृ. २३३

**संत नामदेव यांचा सामाजिक विचार**

**प्रा. अशोक अलगोंडी**